दि. १५/०९/२०२०

# प्रेसनोट

डोंगरी पोलीस ठाणे हद्दीत अल अमीर अपार्टमेंट, १४ वा माळा, रूम क्र. १४०६, जेल रोड, डोंगरी, मुंबई या ठिकाणी फर्निचरचे काम करणारा इसम नामे मुकेश गुप्ता हा रक्ताच्या थोराळयात पडला असलेबाबत दि. १५/०९/२०२० रोजी १०.४५ वा. चे सुमारास डोंगरी मोबाइल १ वाहनास कॉल प्राप्त झाला होता. घटनास्थळी जाउन मुकेश गुप्ता यांस सर जे. जे. रूग्णालय, मुंबई येथे घेउन गेले असता त्यास मयत घोषित करण्यात आले. सदरबाबत अकस्मात मृत्यु नोंद क्र. ६४/२०२० दाखल करून प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली.

प्रकरणाच्या चौकशीत दोन पाहिजे आरोपी यांनी मुकेश गुप्ता याचेशी पैशाच्या कारणावरून असलेल्या वादातून दगडी कडप्पाची पट्टी तोंडावर मारून खून केल्याचे निष्पन्न झाल्याने सरकारतर्फे पो.ह.क्र. २९६४६, श्री. संतोष रघुवर तिवारी यांच्या तक्रारीवरून गु.र.क्र. ११८/२०, कलम ३०२, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासाकरिता मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मुंबई व मा. सहा. पोलीस आयुक्त, डोंगरी विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली दोन पथके आरोपीच्या शोधाकरिता तयार करण्यात आली आहेत.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई.

Scanned with CamScanner